Akshardhara Research Journal
Single Blind Peer-Reviewed & Refereed International Research Journal
E ISSN -3048-8095 / December 2024 / Special Issue 1 Volume III

21

# प्रादेशिक आणि स्थानिक इतिहास लेखन दृष्टिकोनाचा एक अभ्यास

**सुभाष लक्ष्मण अहिरे,**
सहयोगी प्राध्यापक, इतिहास
एम.एस.जी. @मालेगाव-कॅम्प. (नाशिक)

---

**प्रस्तावना:-**

इतिहासाचा वाचक, अभ्यासक, संशोधक यांचा विस्तार 21 व्या शतकात होत आहे. इतिहास विषयाकडे शास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यासक व संशोधन करणारे विद्यार्थी यांची वाढ होत आहे. इतिहासाकडे आता धार्मिक गोष्टी, राजदरबारातील मनोरंजनात्मक कथा, रहस्यमय माहिती यापेक्षा संशोधक आता वेगळा प्रवाह मांडीत आहेत. इतिहास संशोधन करताना संशोधकाची मांडणी इतिहासाच्या विविध प्रवाह नुसार होत असते. इतिहासाच्या संशोधकांना स्थानिक इतिहासातील विविध प्रवाह यांची थोडक्यात ओळख व्हावी यासाठी पुनर्लेखन या वृत्तीने या ठिकाणी आढावा घेण्याच्या प्रयत्न केला आहे. इतिहासातील विविध प्रवाहामध्ये नवनवीन दृष्टिकोनातून पाश्चिमात्य व भारतीय इतिहास संशोधकांनी, विचारवंतांनी, अभ्यासकांनी इतिहासाची शास्त्रीय मांडणी करण्याचा प्रयत्न केला आहे. स्थानिक व प्रादेशिक इतिहासातील प्रवाहाची माहिती माझे गुरुवर्य डॉ. राजा दीक्षित व डॉ. दीपक गायकवाड यांनी स्थानिक इतिहास, प्रादेशिक इतिहास, वंचितांचा इतिहास, स्त्रीवाद इतिहास याबाबत पुणे विद्यापीठ म्हणजे आताचे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,पुणे(इतिहास विभाग) आणि विविध ठिकाणी झालेल्या राष्ट्रीय चर्चासत्रात याबाबत आम्हाला ज्ञानाधिष्ठ केले. फेब्रुवारी 2013 मध्ये नाशिक जिल्ह्यातील मालेगाव-कॅम्प येथील श्रीमती पुष्पाताई हिरे महिला महाविद्यालय,या ठिकाणी “स्थानिक:इतिहास अर्थ स्वरूप व व्याप्ती” या विषयावर राष्ट्रीय चर्चा क्षेत्रात प्रमुख अतिथी व बीजभाषक म्हणून आमचे गुरुवर्य डॉ. राजा दीक्षित यांनी स्थानिक इतिहासावर प्रकाश टाकला, यामुळे उत्तर महाराष्ट्र व पश्चिम महाराष्ट्रातील विविध इतिहास संशोधक प्राध्यापक व विद्यार्थी यांना स्थानिक इतिहासाबद्दल विचार करण्याची एक नवी दिशा मिळाली. आमचे मित्र डॉ. लहू गायकवाड याच स्थानिक इतिहास हा नवा प्रवाह घेऊन आज महाराष्ट्र शासनाच्या जुन्नर भागातील विविध गतकाळातील माहिती पुस्तक रूपाने व चल चित्राने प्रकाशित करीत आहेत. इतिहासातील नवे प्रवाह या शोधनिबंधाचा परिचय करताना मला प्रा. जास्वंदी वांबुरकर यांचीही आभार मानावे लागतील त्यांचे “इतिहासातील नवे प्रवाह” हे डायमंड प्रकाशनचे पुस्तक मुख्य वाटसरू ठरले आहे.

बीच शब्द :- इतिहास लेखन, नवप्रवाह, स्थानिक इतिहास, प्रादेशिक इतिहास, प्रदेश, गाव, नदी, किल्ले, स्थळ

**ध्येय व उद्दिष्टे :-**

1) इतिहासातील नवीन प्रवाहाची ओळख करणे.
2) प्रादेशिक इतिहास व स्थानिक इतिहास याबाबत बोध होणे
3) स्थानिक इतिहासातून राष्ट्रीय इतिहास व वैश्विक इतिहास याची जुळवणी करणे

**गृहितके:-**

1) इतिहास हा गतकाळातील विषय आहे
2) इतिहासाकडे शास्त्रीय दृष्टिकोनातून पाहावे
3) इतिहास संशोधनामध्ये स्थानिक इतिहासला महत्व आहे.

**मुख्य गोषवारा :-**

इतिहास लेखनाचे विविध दृष्टिकोन आहेत त्याला आपण नवीन प्रवाह असे म्हणतो. उदाहरणार्थ स्थानिक इतिहास, प्रादेशिक इतिहास, स्त्री-वादी इतिहास, पर्यावरणीय इतिहास, प्राच्यप्रणाली वाद,लिंगभाव, नव मार्क्सवाद,वंचितांचा इतिहास व उत्तर आधुनिकतावाद इत्यादी इतिहास लेखनाचे विविध दृष्टिकोन आहेत, यापैकी प्रादेशिक व स्थानिक इतिहास हा विषयाचा या ठिकाणी आपण शोधव बोध घेत आहोत.

स्थानिक आणि प्रादेशिक इतिहास लेखन ही अखंडपणे चालणारी प्रक्रिया आहे. इतिहासाच्या जडणघडणीमध्ये व्यक्ती, समाज, स्थळ, काल या चार घटकांचा एकत्रितपणे विचार असतो[1]. या चार घटकांपैकी स्थळ हे महत्त्वाचे घटक आहे. इतिहासाचा संशोधक स्थानिक पातळीवर राहात असेल आणि जर तो स्थानिक पातळीचा अभ्यास करीत असेल तर त्यातील गुणदोष आणि सत्यता व

©Copyright 2024 ADRJ. All Rights Reserved 

Akshardhara Research Journal
Single Blind Peer-Reviewed & Refereed International Research Journal
E ISSN -3048-8095 / December 2024 / Special Issue 1 Volume III

असत्यता यावर प्रकाश टाकू शकतो. संशोधक प्रादेशिक इतिहासावर संशोधन करताना तो राष्ट्रीय इतिहासाबरोबरच प्रादेशिक इतिहासला महत्त्व देतो.आपण याला राष्ट्रीय स्तरावरील इतिहास म्हणजे "समग्रलक्ष अभ्यास" व प्रादेशिक इतिहासाला "अंशलक्षी अभ्यास" असे म्हणता येईल[2]. प्रादेशिक व स्थानिक इतिहासाचे अभ्यासक प्रा डॉ. राजा दीक्षित म्हणतात की, प्रादेशिक इतिहासाचा संशोधनामुळे दुर्लक्षित राहणारा विशिष्टतेचा पैलू प्रकाशात येतो[3]

स्थानिक इतिहास लेखनाची सुरुवात सगळ्यात प्रथम इंग्लंडमध्ये 16 शतकात सुरू झाली. त्याचवेळी फ्रान्समध्ये स्थानिक किल्ले, नाणी, चर्च, शस्त्रे, संग्रहालय, घराणे इत्यादीचा इतिहास लिहिला जाऊ लागला. 19 व्या शतकात व्यापारी, उद्योगपती, प्रसिद्ध व्यक्ती, चर्चचा कारभार पाहणारे अधिकारी व मिशनरी यांनी आपला स्थानिक इतिहास लिहिला.तसेच 1840 मध्ये आपल्या क्षेत्रातील उद्योग, व्यवसायांचा इतिहास लिहिण्यास सुरुवात केली. इंग्लंड येथून अमेरिका खंडात स्थायिक झालेल्या लोकांनी स्थानिक पातळीवर उद्योगात,स्वतंत्र युद्धात भाग घेतलेले स्थानिक नेते, स्थानिक भौगोलिक घटकांचा अभ्यास करून त्याविषयीचा स्थानिक इतिहासाची मांडणी केली[4]

स्थानिक इतिहासाच्या लेखनामध्ये महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर प्रगती होत आहे. महाराष्ट्रातील इतिहास अभ्यासक, साहित्यिक, पत्रकार व इतर अभ्यासकांनी आपल्या लेखनामधून स्थानिक इतिहास लेखनात योगदान दिले आहे[5] या स्थानिक इतिहास लेखनामुळे प्रत्येक ग्राम, खेडी, वाडे,पाडे,खुर्द, गतकाळातील घराणे, व त्यांची कामगिरी, नदी, तलाव, झरे, डोंगररांगा, लेणी,मंदिरे,थडगे, विरंगळ याची स्थानिक नोंद इतिहासलेखनात प्रकाशित होत आहे

स्थानिक इतिहासाबाबत य.दी.फडके- यांनी रोम शहराचा स्थानिक इतिहास बद्दल म्हटले की, इंग्रज इतिहासकार एडवर्ड गिबन,15 ऑक्टोंबर 1764 रोजी रोम शहर पाण्यासाठी गेला असता तेथील टेकडीवरच्या धार्मिक स्थळांचे भग्न अवशेष पाहून त्याला रोमच्या पतनाची कहाणी लिहावी ही कल्पना सुचली. तसे त्याने त्याच्या आत्मचरित्रामध्ये नमूद केले आहे. त्यासाठी अनेक वर्ष तेथे एडवर्ड गिबन संशोधन लिखाण करीत राहिला[6]. यामुळे रोमचा इतिहास लिहिला गेला. प्रादेशिक इतिहास यामध्ये मराठी साहित्यात मोठी वाटचाल दिसून येते. नाशिक जिल्ह्यात मध्ययुगीन कालीन बागलाण हा निसर्ग संपन्न व साल्हेर-मुल्हेर या किल्ल्याने नावाजलेला प्रदेश ओळखला जातो.मराठी साहित्यातील प्रा. शंकर कडू कापडणीस यांनी "बागलाण इतिहास दर्शन" हे पुस्तक संशोधनात्मक लिहिले.त्यामुळे हे संशोधन बागलाणचा प्रादेशिक इतिहासातील मैलाचा दगड ठरला आहे. या पुस्तकाच्या प्रस्तावनेत ते लिहितात की 1974 मध्ये बागलाण येथे सेतूमाधवराव पगडी यांनी सटाणा येथील महाविद्यालयात व्याख्यान दिले त्यावेळी सेतू माधवराव पगडी यांनी प्रा. शंकर कापडणीस यांना बागलाणचा इतिहासाची साधनांची माहिती दिली आणि बागलाणचा इतिहास लिहिण्यास प्रोत्साहित केले.प्रा.कापडणीस म्हणतात की, सेतू माधवराव पगडी यांच्या सहवासात त्यांनी मला सांगितले कि, या तुमच्या प्रदेशाचा इतिहास शोधा, अभ्यास करा आणि काहीतरी लिहा हे तुमचं काम आहे, या प्रेरणेतूनच अभ्यास व संशोधन केले[7] या प्रादेशिक संशोधनामुळे बागलाणचा इतिहास अनेक वाचकांना,संशोधकांना,अभ्यासण्यास मिळत आहे. स्थानिक इतिहासमध्ये शैक्षणिक विद्यापीठांचाही इतिहास स्थानिक पातळीवर लिहिला गेला. जसे प्रा.डॉ. राजा दीक्षित यांनी "पुणे विद्यापीठाचा इतिहास"[8]आणि अरुण टिकेकर यांचा "ऐसा ज्ञानसागरू, बखर मुंबई विद्यापीठाची"[9] हे दोन्ही ग्रंथ शैक्षणिक स्थानिक इतिहास लेखनाची उत्तम उदाहरणे आहेत. त्यामुळे वाचकाला मोठ्या प्रमाणात संशोधन लिखाणाला प्रेरणा मिळाली आहे.

नाशिक जिल्ह्यातील मालेगाव शहराला प्राचीन काळापासून इतिहास आहे हे किंवा समजले, जेव्हा मालेगाव शहरा जवळ वजीरखेडे या गावी श्री. नारायण मोतीराम माळी यांच्या शेतात शेत नांगरताना त्यांना ताम्रपटाचे दोन संच सापडले या ताम्रपटाचे वाचन डॉ. कोलते व्ही. बी. यांनी केले व ते प्रसिद्ध केले त्यामध्ये गिरणा नदीचे नाव गिरीजा किंवा गिरीपर्णा असे आहे[10] तसेच सन 915 मध्ये राष्ट्रकूट घराणाने मालेगाव, कळवण, बागलाण भागातील जैन साधकांना येथील गावे, दान दिल्याची माहिती या ताम्रपटात सापडते. हे प्राथमिक साधन आजही मालेगावचा स्थानिक इतिहास लिहिताना महत्त्वाचे मानले जाते. त्यामुळे मालेगावचा संशोधनात्मक अभ्यास करताना या स्थानिक साधनांचा सत्य आधार सापडतो. ज्यामुळे आज अनेक संशोधक मालेगाव परिसराचा अभ्यास करीत आहेत. डॉ. इलिया सिद्धीकि, यांनी यातून प्रेरणा घेऊन "सरदार नारोशंकर दाणी राजेबहाद्दर व मालेगाव इतिहास" हे पुस्तक स्थानिक इतिहासा करित संशोधकांना दिशादर्शक ठरत आहे.[11]

प्रा जास्वंदी वांबुरकर आपल्या "इतिहासातील नवे प्रवाह" या पुस्तकाच्या प्रस्तावनात म्हणते की,"स्थानिक ते वैश्विक असा सर्व-स्पर्शी इतिहास आता अविष्कृत होत आहे". इतिहास विषयक नव्या प्रवाहंनी इतिहास समृद्ध बनला आहे[12]

निष्कर्ष:- आजही भारतात आणि जगात अशी अनेक लिखित व अलिखित अप्रकाशित साधने काळाच्या उदरात गडप होत आहेत. स्थानिक पातळीवरील अलिखित साधने नष्ट होत आहेत त्यामुळे आपल्या कुळाचा गावाचा वंशाचा धर्माचा इतिहास नष्ट होत चालत

Akshardhara Research Journal
Single Blind Peer-Reviewed & Refereed International Research Journal
*E ISSN -3048-8095 / December 2024 / Special Issue 1 Volume III*

आहे यातून प्रेरणा घेऊन हे स्थानिक इतिहासाचे जतन करणे हे आपले कर्तव्य आहे .लिखित साधने ही स्थानिक पातळीवर बऱ्याच ठिकाणी मिळविणे अवघड असते त्यामुळे स्थानिक पातळीवरील घराणे, कर्तबगार व्यक्ती आणि त्यांचे वारस किंवा अनेक पडलेल्या वाड्यांमध्ये ही कागदपत्र धुळखात पडली आहेत या स्थानिक इतिहास लेखनासाठी कागदपत्रांची कमतरता मोठ्या प्रमाणात आज भासत आहे त्यामुळे ही कागदपत्रे म्हणजे त्या संशोधकाला अमूर्त अशी आहेत. प्रादेशिक व स्थानिक इतिहास हे लिखाण राष्ट्राच्या उभारणीत पायाभरणीचे काम करीत आहे हा पाया भक्कम उभा राहिला म्हणजे आपल्याला राष्ट्राचा इतिहास लिहिताना दगडाच्या खाणीत असलेले हे हिऱ्यासारखे आहेत हेज्याला कळेल तोच खरं ज्ञानपिपासू संशोधक आहे

संदर्भ:-

1) जोशी,लक्ष्मण शास्त्री.(संपा.), मराठी विश्वकोश, खंड-2, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई,१९७६,पृ.५०२
2) देव, प्रभाकर., इतिहास एक शास्त्र, ब्रेनटॉनिक प्रकाशन, नांदेड,२००२, पृ. ३७.
3) दीक्षित,राजा.,प्रादेशिक इतिहासाचा वर्तमान संदर्भ, इतिहासशिक्षक, पुणे, ऑक्टों.ते डिसें.२००४, पृ. ३.
4) Howe Barbara., A century of Local History Writing JSTOR :OAH Magazine of History Vol 4 no. 3.1989,P. 10- 15
5) Dikshit, Raja., Historical Writing and Research in Rajendra Banhatti and Jogalekar G.N (ed.) History of Modern Marathi Literature vol.2 Maharashtra Sahitya Parishad Pune, 2004,P. 238 -39
6) फडके,य.दि., विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड ५, के. सागर पब्लिकेशन, पुणे,२०१२ पृ.२१.
7) शं.क.कापडणीस.,बागलाण इतिहास दर्शन,प्रकाशक,शकुंतला कापडणीस,सटाणा २०१४., पृ.१प्रस्तावना.
8) दीक्षित,राजा., पुणे विद्यापीठाचा इतिहास, पुणे विद्यापीठ, पुणे, १९९९
9) टिकेकर,अरुण., ऐसा ज्ञानसागरु, बखर मुंबई विद्यापीठाची, मुंबई विद्यापीठ, मुंबई, २००७
10) कोलते, विष्णू भिकाजी., गिरीपर्णा केतश्री प्रकाशन, 1989, अमळनेर, पृ.१
11) सिद्दीकी,इलियास., नारोशंकर राजेबहाद्दर आणि मालेगावचा इतिहास, सिटीजन वेल्फेअर सोसायटी, मालेगाव, प्रथम आवृत्ती, जुलै २००८.
12) वांबुरकर, जास्वंदी., इतिहासातील नवे प्रवाह, डायमंड पब्लिकेशन, पुणे, २०१४, पृ.५